**नि.दि.दा.क्र.८८/२०१७**
**दत्तात्रय वि. मारुती व इतर**
**नि. क्र. ५० पुढे सुरु**

नि.क्र.८४ वरील आदेशानुसार साक्षीदाराचा उलटतपास शपथेवर सुरु
**प्रतिवादी क्र.१ यांच्यातर्फे विधिज्ञ श्री यु.एच.सणस**

२४. निशाणी क्र २७ वरील मुखत्यारपत्र मीच अभिलेखावर दाखल केले आहे. त्यामध्ये लिहून देणार म्हणून मारुती गार्डे यांचे नाव नमूद असून लिहून घेणार म्हणून माझ्या नावाचा उल्लेख आहे. त्यावरील प्रत्येक पानावर मारुती गार्डे यांच्या सहया आहे. हे म्हणणे खरे आहे की, ती सही ''मारुती रा. गार्डे'' अशी मराठीत आहे. मला ती सही परिचयाची आहे. माझ्या मते मारुती गार्डे प्रत्येक ठिकाणी तशीच सही करायचे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र ५७ वरील मृत्यूपत्रमध्ये ''मारुती रा. गार्डे'' अशी सही नाही. सदरचे मुखत्यारपत्र दि. १४/१२/२०१७ रोजी केल्याचे त्यात नमूद आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत दाव्यात मारुती गार्डे यांच्या तर्फे मीच सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि. १४/१२/२०१७ रोजीचे निशाणी क्र २७ वरील मुखत्यारपत्र मारुती गार्डे यांच्या प्रकृती अस्वस्थामुळे करण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र ५७ वरील मूत्यृपत्रसह मारुती गार्डे यांचे वैदयकीय प्रमाणपत्र जोडलेले नाही.

२५. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत दाव्यापूर्वी वादी दत्तात्रय यांनी नियमीत दिवाणी दावा क्रमांक ३६३/२००६ दाखल केला होता. प्रस्तुत नियमीत दिवाणी दावा क्र ८८/२०१७ मध्ये मारुती गार्डे यांनी दि. १५/१२/२०१७ रोजी स्वतः त्यांची कैफियत दाखल केल्याचे मला सांगता येणार नाही. आता मला निशाणी क्र १५ वरील कैफियत दाखवण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, त्या कैफियतवर दि. १५/१२/२०१७ रोजी मारुती गार्डे यांचा निशाणी अंगठा असून तो बांधलेला आहे. तो कोणी बांधला याबाबत मला सांगता येणार नाही. तसेच त्या कैफियतीवर विधीज्ञ श्री. ए.के.शिंदे यांची देखील सही आहे. ज्यादिवशी निशाणी क्र २७ वरील मुखत्यारपत्र माझ्या नावे करण्यात आले त्या दिवसापासूनच मी दाव्याच्या कामकाजास सुरुवात केली. दि. १५/१२/२०१७ रोजीच्या कैफियतीवर मारुती गार्डे यांचे अंगठे का नमूद आहेत याचे कारण मला सांगता येणार नाही.

मारुती गार्डे माझ्या नावे मुखत्यारपत्र दिलेले असताना देखील स्वतः कैफियत दिली कारण ते वयोवृध्द होते. दि.१५/१२/२०१७ रोजी मी मारुती गार्डे यांच्यासह न्यायालयात हजर होतो. दि. १५/१२/२०१७ रोजीच्या मारुती गार्डे यांच्या कैफियत सह दाखल असलेल्या प्रतिज्ञापत्रवरही मारुती गार्डे यांचा अंगठा असल्याचे दिसून येत आहे.

२६. मी प्रस्तुत दाव्यात माझे साक्षशपथपत्र दाखल करण्यापूर्वी नियमीत दिवाणी दावा क्र ३६३/२००६ ची माहिती घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदरील दाव्यात मारुती रामा गार्डे हे प्रतिवादी होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या दाव्यात माझे वडील शिवाजी गार्डे हे मारुती गार्डे यांच्या वतीने काम पाहत होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरील दाव्याच्या निकालावर जिल्हा न्यायालय सातारा येथे नियमीत दिवाणी अपील क्र. १३२/२०११ दाखल करण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या अपीलात देखील मारुती गार्डे यांच्यावतीने माझे वडीलच काम पाहत होते. हे म्हणणे खरे नाही की, मारुती गार्डे यांच्या प्रकृती अस्वस्थामुळे माझे वडीलच त्या दाव्यात काम पाहत होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरील अपीलाच्या निकालाविरुध्द मा. उच्च न्यायालयात देखील अपील दाखल करण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या अपीलात देखील मारुती गार्डे यांच्या प्रकृती अस्वस्थामुळे माझे वडील काम पाहत होते. हे म्हणणे खरे आहे की, सन २००६ ते मारुती गार्डे हयात असेपर्यंत त्यांच्या प्रकृती अस्वस्थाच्या कारणामुळे मी व माझे वडील त्यांच्यावतीन न्यायालयीन कामकाज पाहत होतो.

***प्रकरण उर्वरीत उलटतपासाकरीता तहकुब.***

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.04.05 12:50:33 +0530

(आर. एम. भेंडे)

दिनांक :- ०५/०३/२०२५ सह दिवाणी न्यायाधीश, वाई.